महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

मुख्य संपादक : रवींद्र घोडविंदे

Rs.2/-

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

मंगळवार ❖१८ मार्च २०२५ ❖वर्ष ६ ❖अंक २६० ❖ पाने – ४ ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

थोडक्यात महत्वाचे

## उष्माघाताचा धोका वाढला सिव्हील रुग्णालयात विशेष कक्ष



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : ठाणे जिल्ह्याचे कमाल तापमान ३८ ते ४० अंशावर पोहोचले असून लहानग्यांसह ज्येष्ठांना याचा मोठ्या प्रमाणात त्रास होऊ लागला आहे. उष्माघाताचा धोका वाढण्याची शक्यता असल्याने सिव्हील रुग्णालयात २५ खाटांचा विशेष वातानुकूलित कक्ष सर्व यंत्रणांनी सुसज्ज ठेवण्यात आला आहे. सूर्यदेवाने रौद्ररूप धारण केल्याने काही दिवसांपासून तापमान प्रचंड प्रमाणात वाढले आहे. सकाळी नऊनंतर उन्हाच्या झळा बसतात तर दुपारच्या वेळेत घराबाहेर पडणे सर्वांसाठी त्रासदायक ठरत आहे. सद्यस्थितीत ठाणे जिल्ह्याचे कमाल तापमान ३८ ते ४० अंशावर पोहोचले आहे. त्यामुळे वाढत्या तापमानाचा त्रास नागरिकांना होण्याची शक्यता आहे. कोणाला उष्माघाताचा त्रास झालाच तर उपचारासाठी सिव्हील रुग्णालय सज्ज आहे. रुग्णालयात २५ खाटांचा वातानुकूलित विशेष कक्ष निर्माण केला असल्याची माहिती जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. कैलास पवार यांनी दिली. या वर्षीचा उष्मा अधिक तीव्र असल्याचे भाकित हवामान विभागाकडून वर्तवण्यात आले आहे. उकाडा वाढल्यामुळे थकवा येणे, ताप येणे, त्वचा कोरडी पडणे, भूक न लागणे, चक्कर येणे, निरुत्साही वाटणे, डोके दुखणे, रक्तदाब वाढणे, मानसिक अस्वस्थता, बेशुद्धावस्था इत्यादी लक्षणे आढळतात. महत्वाचे काम असल्यास तरच दुपारच्या उन्हात बाहेर पडावे. उन्हाळ्यात जास्तीत जास्त पाणी प्यावेहलकी, पातळ सूती कपडे वापरावेत, बाहेर जाताना गॉगल्स, छत्री, टोपी, बुट व चपलांचा वापर करावा. प्रवास करताना पाण्याची बाटली सोबत ठेवावी. उन्हात काम करीत असलेल्या व्यक्तींनी डोक्यावर टोपी किंवा छत्रीचा वापर करावा तसेच ओल्या कपड्यांनी डोके, मान व चेहरा झाकावा. शरीरातील पाण्याचे प्रमाण कमी होत असल्यास ओआरएस, घरी बनविण्यात आलेली लस्सी, लिंबू-पाणी, ताक इत्यादींचा नियमित वापर करावा. उष्माघात रुग्णांची संख्या वाढल्यास त्याप्रमाणे रुग्णशय्या वाढवण्यात येतील, अशी माहिती जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. कैलास पवार यांनी दिली.

## वन कर्मचाऱ्यांच्या आशीर्वादाने पडघ्यात वनजमिनीवर अतिक्रमण?

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**शहापूर**ः पडघा वनक्षेत्रातील पडघा परिमंडळ अंतर्गत वनरक्षक व त्यांचे सहकारी यांच्या संगनमताने मोठ्या प्रमाणात आर्थिक व्यवहार करुन भूमाफियांना वनजमिनींवर अतिक्रमण करण्यास सहकार्य केले जात असून त्यांच्यावर कारवाई करावी अन्यथा आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा सामाजिक कार्यकर्ते दिपक चंदे यांनी उपवन संरक्षक, ठाणे यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे.

तक्रारीनुसार सर्वे नंबर १९३ धामणगाव येथे परप्रांतीय नागरिकांनी गॅरेज, हरियाणा-यूपी मेवान नावाचा ढाबा आणि पार्किंगसाठी वनजमिनीचा बेकायदेशीर वापर केला आहे. तसेच एका गोट फार्मसाठी वनजमिनीत भराव टाकून अनधिकृत रस्ता तयार करण्यात आला आहे.

दरम्यान जानवळ हद्दीत एका खडीमशीनसाठी वनजमिनीतून रस्ता बनवण्यात आल्याचा आणि सर्वे नंबर ६६ येळकुंद्रा येथे आर. के. इम्पायर या विकासकाला ४० फूट रुंदीचा आणि १०० मीटर लांबीचा काँक्रीट रस्ता करण्यास मदत केल्याचा आरोप केला आहे. याशिवाय धामणगाव येथे जय मल्हार ढाब्याच्या मागे मोठ्या प्रमाणात अनधिकृत चाळी उभारण्यात येत असून, या बांधकामासाठी आर्थिक देवाण-घेवाण झाल्याचे तक्रारीत नमूद आहे. विशेष म्हणजे गरिबांसाठी किंवा आदिवासी वाड्यांसाठी वनविभाग रस्ते मंजूर करत नसताना मुंबई-नाशिक महामार्गालगतच्या परिसरात मोठ्या प्रमाणात अतिक्रमण सुरू असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

तक्रारदारांनी मुख्यमंत्री, वनमंत्री, जिल्हाधिकारी आणि संबंधित वन अधिकाऱ्यांकडे तातडीने चौकशी करून योग्य कारवाई करण्याची मागणी केली असून कार्यवाही न केल्यास तीव्र आंदोलन करण्याचा इशारा देखील दिला आहे.

# छत्रपती शिवाजी महाराजांचे मंदिर सर्वांसाठी अभिमानास्पद अन् प्रेरणादायी

### – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस





दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : देव, देश अन् धर्मापायी ज्या राजाने आपले संपूर्ण आयुष्य खर्ची पाडले, सर्वांसाठी दैवत असलेल्या छत्रपती शिवरायांचे मंदिर होणे, ही अतिशय अभिमानाची बाब असून सर्वांसाठी प्रेरणादायी आहे. येथे महाराजांच्या दर्शनाला येणाऱ्या प्रत्येकाला निश्चितच प्रेरणा मिळणार आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे केले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते शिवक्षेत्र मराडे पाडा, ता.भिवंडी येथील छत्रपती शिवाजी महाराज मंदिर (शक्तीपीठ) लोकार्पण संपन्न झाले. त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी स्वामी गोविंद देवगिरीजी महाराज, प.पू. बालयोगी सदानंद बाबा, ह.भ.प डॉ.कैलास महाराज निचिते, राष्ट्रसंत नीलकंठ शिवाचार्य, प.पू. आलोकनाथ महाराज, खासदार सुरेश म्हात्रे ऊर्फ बाळ्या मामा, आमदार किसन कथोरे, माजी केंद्रीय मंत्री कपिल पाटील,आमदार दौलत दरोडा, आमदार निरंजन डावखरे, आमदार महेश चौघुले, शिवक्रांती प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष राजू चौधरी, श्री.विश्वनाथ पाटील, नरेंद्र पवार, जितेंद्र डाकी, विभागीय आयुक्त डॉ.विजय सूर्यवंशी, विशेष पोलीस महानिरीक्षक कोकण परिक्षेत्र संजय दराडे, जिल्हाधिकारी अशोक शिनगारे, मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे, पोलीस अधीक्षक डॉ.डी. एस. स्वामी, श्री.अनंता भोईर, आदी मान्यवर उपस्थित होते.




सर्वप्रथम मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उपस्थितांना छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त शुभेच्छा देत त्यांनी कैलास निचिते व राजू चौधरी यांचे छत्रपती शिवाजी महाराजांच्या भव्य मंदिराच्या संकल्पना व प्रत्यक्ष निर्माणाकरिता कौतुक केले. ते म्हणाले की, आपण छत्रपती शिवाजी महाराज यांच्यामुळेच आपल्या इष्ट देवतेचे मंदिरात जावून दर्शन घेवू शकतो. देव, देश अन् धर्मापायी ज्या राजाने आपले संपूर्ण आयुष्य खर्ची पाडले, त्यांचे मंदिर होणे, ही अतिशय अभिमानाची बाब आहे. अतिशय सुंदर, भव्य दिव्य असे हे मंदिर निर्माण करण्यात आले आहे. या मंदिराला सुंदर तटबंदी आहे, अतिशय चांगले बुरुज आहे, दर्शनीय अशा प्रकारचा प्रवेशाचा मार्ग, बगीचा आहे आणि या मंदिराच्या माध्यमातून महाराजांच्या जन्मापासून ते राज्याभिषेक आणि पुढे संभाजी महाराजांची वाटचाल असे अतिशय सुरेख प्रसंग उभे करण्यात आले आहेत. यातून प्रत्येकाला निश्चितच प्रेरणा मिळणार आहे. जसे हनुमानाचे दर्शन घेतल्याशिवाय प्रभू श्रीरामांचे दर्शन पूर्ण होत नाही तसेच छत्रपती शिवरायांच्या दर्शनाशिवाय कुठल्याच देवाचे दर्शन पूर्णत्वास येत नाही.

आई जिजाऊंच्या संस्कारांनी अन् आशिर्वादाने शिवबा घडले. त्यांच्या प्रेरणादायी शिकवणीतूनच शिवरायांनी मुघलांच्या आव्हानांचा प्रतिकार करायला सुरुवात केली. प्रभू श्रीराम हे युगपुरुष होते. त्यांनी समाजातील सर्वात शेवटच्या व्यक्तीमध्ये अन्यायाविरुद्ध लढण्याची शक्ती निर्माण केली. त्याप्रमाणेच छत्रपती शिवाजी महाराजांचे कार्य आहे. रावणाविरुद्ध लढताना जसे श्रीरामांनी सर्वसामान्यांना एकत्र केले तसेच छत्रपती शिवाजी महाराजांनी मुघलांच्या बलाढ्य फौजेविरुद्ध सर्वसामान्य जनतेतून शक्ती निर्माण केली आणि भगवा झेंडा फडकविला. जातीपातीत विभागलेला महाराष्ट्र महाराजांना अपेक्षित नाही. देव, देश आणि धर्मापायी सर्वस्व पणाला लावणारा, देशाचा गौरव वाढविण्याचा संकल्प करणारा महाराष्ट्र आपल्याला घडवायचा आहे. छत्रपती शिवाजी महाराजांची 300 वी जन्मशताब्दी साजरी होत असताना देश घडविण्याच्या कार्यात आपले योगदान देवू या, असे आवाहनही मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी केले.

ते पुढे म्हणाले की, राज्य व केंद्र शासनाकडून छत्रपती शिवाजी महाराजांच्या बारा किल्ल्यांचा जागतिक वारसा म्हणून नोंद होण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. संगमेश्वर येथे देखील छत्रपती संभाजी महाराजांचे स्मारक उभारण्यात येणार असून त्यासाठी राज्याच्या अर्थसंकल्पात तरतूद करण्यात आली आहे. पानिपत येथील लढाई सर्वांना माहितच आहे. महादजी शिंदे यांनी गाजविलेला पराक्रम सर्वांना माहीत आहे. त्या ठिकाणीही भव्य स्मारक उभारण्याचे नियोजन करण्यात येत आहे.

आज लोकार्पण झालेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या या शक्तीपिठाला तीर्थस्थळाचा दर्जा देण्यात येईल. त्याचप्रमाणे भिवंडी-वाडा या रस्त्याचे कामही प्रगतीपथावर आहे. येथील सार्वजनिक बांधकाम विभागाने या शक्तीपिठाकडील येणाऱ्या सर्व मार्गांचे नियोजन उत्तमरित्या करावे, येथे येणाऱ्या शिवप्रेमींसाठी आवश्यक सोयीसुविधा तयार कराव्यात. शासन यासाठी तत्पर असून याकरिता निधीची कमतरता पडणार नाही.

कार्यक्रमाच्या सुरुवातीस आयोजन समितीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे शाल, पुष्पगुच्छ आणि लोकार्पण झालेल्या मंदिराची प्रतिकृती देवून सत्कार केला.

या लोकार्पण कार्यक्रमाप्रसंगी खासदार सुरेश म्हात्रे ऊर्फ बाळ्या मामा, आमदार किसन कथोरे व माजी केंद्रीय मंत्री कपिल पाटील यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

### सरस विक्री प्रदर्शनात

# ग्रामीण भागातील महिलांच्या उत्पादनांच्या विक्रीचा उच्चांक



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : जिल्हा ठाणे अंतर्गत स्वयं सहाय्यता समुहातील महिलांनी उत्पादित केलेल्या विविध वस्तूंना हक्काची बाजारपेठ उपलब्ध व्हावी, या उद्देशाने विभागीय आयुक्त, कोकण विभाग डॉ. विजय सुर्यवंशी (भा.प्र.से.), जिल्हाधिकारी अशोक शिनगारे (भा.प्र.से.) व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद ठाणे, रोहन घुगे (भा.प्र.से.) यांच्या मार्गदर्शनाखाली विभागीय आयुक्त कार्यालय कोकण विभाग, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, ठाणे आणि महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (MSRLM) यांच्या संयुक्त विद्यमाने वज्रेश्वरी महोत्सव "कोकण सरस, जिल्हास्तरीय सरस व मिनी सरस विक्री प्रदर्शन" दि. 12 ते 16 मार्च 2025 दरम्यान, गावदेवी मैदान ठाणे स्टेशन रोड ठाणे (प) येथे आयोजित करण्यात आला होता.

खास करून महिलांनी स्वतः बनवलेल्या विविध खाद्यपदार्थ, हस्तकला वस्तू, कपडे आणि घरगुती वापराच्या विविध वस्तूंचे 188 स्टॉल लावण्यात आले होते. त्यात 450 हून अधिक महिलांचा सहभाग होता. यापैकी 19 खाद्यपदार्थांचे (Food Stall) स्टॉल व 169 हस्तकला वस्तू, कपडे आणि घरगुती वापराच्या विविध वस्तूंचे स्टॉल लावण्यात आले होते. सरस प्रदर्शनास मुंबई, मुंबई उपनगरे व ठाणे तसेच इतर जिल्हयातील जवळपास 15,000 ग्राहकांनी भेट दिली व उत्स्फूर्त प्रतिसाद देऊन खरेदी केली.

स्वयं सहाय्यता समुहातील महिलांनी बनविलेल्या वस्तूंची 66.31 लक्षची विक्रमी विक्री या प्रदर्शनात झाली, अशी माहिती प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, जिल्हा परिषद, ठाणे छायादेवी शिसोदे यांनी दिली.

# मराठी शाळा वाचवा

## जिल्हाधिकारी कार्यालयाजवळ शिक्षकांचे धरणे आंदोलन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : प्रलंबित शिक्षक पदवीधर पदोन्नती प्रक्रिया राबविण्यासह १५ मार्च संच मान्यता निर्णय रद्द करावा अशा प्रमुख मागण्यांसाठी ठाणे जिल्हा प्राथमिक शिक्षक समितीतर्फे सोमवारी ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयाजवळ धरणे सत्याग्रह आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात जिल्ह्यातील शेकडो शिक्षक सहभागी झाले होते. 'मराठी शाळा वाचवा', 'ग्रामीण भागातील गोरगरिबांचे शिक्षण वाचवा' अशा आशयाचे फलक हातात घेऊन हे सर्व शिक्षक भर उन्हात रस्त्यावर उतरले होते.




राज्यात १५ मार्च २०२४ च्या शासन निर्णयानुसार सन २०२५ ची संच मान्यता अंतिम करून शिक्षक निश्चिती करण्यात आली आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील मराठी शाळांमध्ये मोठ्या प्रमाणावर शिक्षक संख्या कमी होण्याची चिन्हे आहेत. हा शासन निर्णय शिक्षण हक्क कायद्याच्या विसंगत असून या निर्णयाची अंमलबजावणी झाल्यास शाळेमध्ये शिक्षकांची संख्या कमी होऊन राज्यांमध्ये जवळपास वीस हजार शिक्षक अतिरिक्त ठरणार आहेत. तर, ठाणे जिल्ह्यात जवळपास साडेतीनशे शिक्षक कमी होणार असल्याचे आंदोलनकार्यांनी सांगितले. दरम्यान, आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर वीस पटाच्या आतील इयत्ता सहावी ते आठवी पर्यंतच्या शाळांना शून्य शिक्षक मंजूर नियमात बदल करून एक शिक्षक मंजूर करून अंशातः बदल केला असला तरी, आंदोलनावर ठाम राहत महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीने ठाणे जिल्ह्यासह सोमवारी राज्यभर आंदोलन केले.

**या आहेत मागण्या**

- **१५ मार्च २०२४ चा संच मान्यता शासन निर्णय रद्द करा.**
- **ठाणे जिल्हा परिषद शिक्षक कर्मचाऱ्यांचे डीसीपीएस खात्यातील रक्कम एनपीएस खात्यावर वर्ग करा.**
- **प्रलंबित शिक्षक पदवीधर पदोन्नती प्रक्रिया राबवा**

**१५ मार्च २०२४ ची संच मान्यता काय आहे?**

- **इयत्ता १ ली ते ५ वी पर्यंत पाच वर्गांना वीस पटापर्यंत एकच शिक्षक.**
- **इयत्ता ६ वी ते ८ वी पर्यंत तीन वर्गांना वीस पटापर्यंत सर्व विषयांसाठी एकच शिक्षक.**
- **पूर्वी ६० पटाच्या वर तिसरा शिक्षक मंजूर व्हायचा तो आता ७६ च्या वर मंजूर होणार.**



# गीतासार



### अध्याय ५
### कर्मसंन्यासयोगः

यत्सांख्यैः प्राप्यते स्थानं तद्योगैरपि गम्यते । एकं सांख्यं च योगं च यः पश्यति स पश्यति ॥ ५-५ ॥

ज्ञानयोग्यांना जे परमधाम प्राप्त होते; तेच कर्मयोग्यांनाही प्राप्त होते. म्हणून जो मनुष्य ज्ञानयोग आणि कर्मयोग हे फळाच्या दृष्टीने एकच आहेत, असे पाहतो, तोच खऱ्या अर्थाने पाहतो. ॥ ५-५ ॥

संन्यासस्तु महाबाहो दुःखमाप्तुमयोगतः । योगयुक्तो मुनिर्ब्रह्म नचिरेणाधिगच्छति ॥ ५-६ ॥

परंतु हे महाबाहो अर्जुना, कर्मयोगाशिवाय मन इंद्रिये व शरीर यांच्याकडून होणाऱ्या सर्व कर्मांच्या बाबतीत कर्तेपणाचा त्याग होणे कठीण आहे. आणि भगवत्स्वरूपाचे चिंतन करणारा कर्मयोगी परब्रह्म परमात्म्याला फार लवकर प्राप्त होतो. ॥ ५-६ ॥

योगयुक्तो विशुद्धात्मा विजितात्मा जितेन्द्रियः । सर्वभूतात्मभूतात्मा कुर्वन्नपि न लिप्यते ॥ ५-७ ॥

ज्याचे मन स्वतःच्या ताब्यात आहे, जो इंद्रियनिग्रही आणि शुद्ध अंतःकरणाचा आहे, तसेच सर्व सजीवांचा आत्मरूप परमात्माच ज्याचा आत्मा आहे, असा कर्मयोगी कर्मे करूनही अलिप्त राहातो. ॥ ५-७ ॥

## आरोग्य
# अंजीरचे फायदे



१. पचन सुधारते: अंजीरमध्ये फायबरचे प्रमाण जास्त असते, जे पचन सुधारण्यास मदत करते. यामुळे बद्धकोष्ठता, अपचन आणि पोटदुखीसारख्या समस्यांपासून आराम मिळतो.

२. रक्तदाब नियंत्रित करते: अंजीरमध्ये पोटॅशियमचे प्रमाण जास्त असते, जे रक्तदाब नियंत्रित करण्यास मदत करते. यामुळे हृदयरोगांचा धोका कमी होतो.

3. हाडे मजबूत करते: अंजीरमध्ये कॅल्शियम भरपूर प्रमाणात असते, जे हाडे मजबूत करण्यास मदत करते. हे ऑस्टियोपोरोसिस सारख्या हाडांच्या आजारांना प्रतिबंधित करते.

४. रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित करते: अंजीरमध्ये फायबर आणि इतर पोषक घटक असतात जे रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित करण्यास मदत करतात. मधुमेहाच्या रुग्णांसाठी ते फायदेशीर आहे.

५. रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करते: अंजीरमध्ये व्हिटॅमिन सी आणि अँटीऑक्सिडंट्स असतात जे रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करतात. हे शरीराला रोगांशी लढण्यास मदत करते.

६. वजन कमी करण्यास मदत करते: अंजीरमध्ये कॅलरीज कमी असतात आणि त्यात भरपूर फायबर असते. हे पोट बराच वेळ भरलेले ठेवते आणि वजन कमी करण्यास मदत करते.

७. डोळ्यांसाठी फायदेशीर: अंजीरमध्ये व्हिटॅमिन ए असते जे डोळ्यांच्या आरोग्यासाठी खूप महत्वाचे आहे. हे दृष्टी सुधारण्यास मदत करते आणि मोतीबिंदूचा धोका कमी करते.

८.कर्करोग प्रतिबंधक: अंजीरमध्ये अँटीऑक्सिडंट्स असतात जे कर्करोगाच्या पेशींच्या वाढीस प्रतिबंध करण्यास मदत करतात.

# पुष्कर जोगच्या ‘त्या’ लूकची सर्वत्र चर्चा!




समाजात अद्यापही फारसा खुलेपणाने न बोलला जाणारा विषय म्हणजे लैंगिक सुसंगती. याच नाजूक विषयावर भाष्य करणारा आणि प्रेक्षकांना विचार करायला भाग पाडणारा ‘हार्दिक शुभेच्छा... पण त्याचं काय?’ हा चित्रपट लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. या चित्रपटाचा ट्रेलर काही दिवसांपूर्वीच सोशल मीडियावर प्रदर्शित झाला असून त्याला प्रेक्षकांकडून भरभरून प्रतिसाद मिळतोय. विशेष म्हणजे यात पुष्कर जोग एका वेगळ्या लूकमध्ये दिसत आहे. पुष्करचा असा लूक यापूर्वी कधीच त्याच्या चाहत्यांनी पाहिलेला नाही. त्याचा हा नवा लूक आणि व्यक्तिरेखेतील सच्चेपणा यामुळे प्रेक्षकांना त्याची नेमकी भूमिका काय आहे, हे जाणून घेण्याची प्रचंड उत्सुकता निर्माण झाली आहे.

चित्रपटातील आपल्या भूमिकेबद्दल पुष्कर जोग म्हणतो, "आजवर मी अनेक वेगवेगळ्या विषयांवर चित्रपट केले, परंतु ‘हार्दिक शुभेच्छा... पण त्याचं काय?’ हा माझ्यासाठी एक वेगळाच अनुभव होता. माझ्या चित्रपटातील प्रत्येक पात्र मी सामान्य माणसाच्या जीवनाशी जोडलेले असते. मी नेहमीच पात्रांसोबत वेगवेगळे प्रयोग करत असतो. असाच एक प्रयोग यातही केला आहे. या भूमिकेसाठी मला माझ्या लूकवर विशेष मेहनत घ्यावी लागली. केस कमी दाखवण्यासाठी दररोज सेटवर सगळयात आधी येऊन मेकअप आणि हेअर स्टायलिंग करावे लागत होते. या लूकला शूटिंग संपेपर्यंत सांभाळून ठेवणे देखील एक चांगलीच कसरत होती! मात्र, हे पात्र साकारताना खूप समाधान मिळालं, कारण हे पात्र आजच्या काळातील अनेक लोकांच्या आयुष्यातील वास्तव सांगणारे आहे. प्रेक्षकांशी भावनिक संवाद साधणे हे मला महत्वाचे वाटते. चित्रपटाच्या कथानकात दोन व्यक्तींमधील भावनिक सुसंवाद किती महत्वाचा आहे हे यामध्ये अधोरेखित करण्यात आले आहे."

‘हार्दिक शुभेच्छा ... पण त्याचं काय?’ हा चित्रपट २१ मार्चला चित्रपटगृहात प्रेक्षकांच्या भेटीला येणार असून यात पुष्कर जोग, हेमल इंगळे, पूर्वी मुंदडा, विशाखा सुभेदार, अभिजीत चव्हाण, अनुष्का सरकटे, पृथ्विक प्रताप, विजय पाटकर, भरत सावळे आणि किशोरी अंबिये या कलाकारांच्या प्रमुख भूमिका आहेत. आनंद पंडित मोशन पिक्चर्स प्रस्तुत, गुझबम्प्स एंटरटेनमेंट यांच्या ‘हार्दिक शुभेच्छा ... पण त्याचं काय?’ या चित्रपटाचे दिग्दर्शन व लेखन पुष्कर जोग यांनी केले असून आनंद पंडित, रुपा पंडित आणि पुष्कर जोग निर्माते आहेत. तर या चित्रपटाचे सहलेखन नमिष चापेकर यांनी केले आहे. पॅनोरमा स्टुडिओजने या चित्रपटाच्या वितरणाची धुरा सांभाळली आहे.

# बंधने फक्त महिलांवरच का ?



आज २१ व्या शतकात पुरुष आणि महिला असा कोणताच भेद राहिला नाही. आज महिलाही पुरुषांच्या बरोबरीने सर्वच क्षेत्रात अग्रेसर आहेत. असे कोणतेच क्षेत्र नाही जिथे महिला पुरुषांची बरोबरी करू शकत नाही. कला, क्रीडा, राजकारण, समाजकारण, अर्थकारण, विज्ञान, तंत्रज्ञान, शिक्षण, साहित्य अशा सर्वच क्षेत्रात महिला पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून काम करत आहे मात्र समाजात आजही असा एक घटक आहे ज्यांना महिलांची ही प्रगती खटकत आहे. आजही तो घटक महिलांना केवळ चूल आणि मूल या पुरतच मर्यादित ठेवू इच्छितो म्हणूनच हे सनातनी विचारांचे प्रतिगामी लोक महिलांना सतत या ना त्या कारणांहून ट्रोल करत असतात. कधी ते महिलांच्या केशभूषे वरून ट्रोल करतात तर कधी ते महिलांना त्यांच्या वेशभूषेवरुन ट्रोल करतात. आजच्या मुली मुलांप्रमाणे कपडे घालतात, जीन्स पॅन्ट टी शर्ट घालतात त्यांच्या जीन्स पॅन्ट गुडघ्यावर फाटलेल्या असतात याचा त्यांना राग येतो तर कधी मुलींच्या नटण्या मुरडण्याचा त्यांना राग येतो. महिलांना ट्रोल करण्यात समाजातील प्रतिष्ठित घटकही मागे नसतात. महिला गुडघ्यावर फाटलेली जीन्स घालतात हे कसले संस्कार असे ? असा प्रश्न मध्यंतरी उत्तरांचलच्या मुख्यमंत्र्यांनी जाहीर सभेत विचारला होता. केवळ हेच महाशय नाही तर अनेकजण महिलांच्या वेशभूषेवरुन महिलांना टार्गेट करत असतात वास्तविक कोणी कोणते कपडे वापरायचे हा ज्याचा त्याचा प्रश्न आहे. सार्वजनिक ठिकाणी गुडघ्यावर फाटलेली जीन्स पॅन्ट फक्त महिलाच घालतात का? पुरुषही फाटलेली जीन्स घालतात. बरमुडा किंवा शॉर्ट पॅन्ट घालून गावभर फिरतात पण त्यांच्या कपड्यावर कोणीच आक्षेप घेत नाही. म्हणजे पुरुषांनी कसलेही कपडे वापरले तरी चालेल मात्र महिलांना ते स्वातंत्र्य नाही. महिलांना मात्र त्यांच्या आवडीचे कपडे घालायला बंदी. मग प्रश्न येतो बंधने फक्त महिलांवरच का? महिलांनी कोणते कपडे घालावेत हे ठरवण्याचा अधिकार पुरुषांना कोणी दिला? महिलांनी कोणते व कसे कपडे घालावेत, महिलांनी कोठे फिरावे, काय खावे, काय प्यावे हे पुरुषांनी ठरवावे ही तर अठराव्या शतकातील मानसिकता झाली. २१ व्या शतकातही महिलांना समान अधिकार मिळत नाही त्यांना त्यांच्या अधिकारासाठी झगडावे लागते ही दुर्दैवाची बाब आहे. स्त्री पुरुष समानता ही फक्त बोलण्यापूरतीच आहे हेच या मानसिकतेतून दिसून येते. जगात एकीकडे महिलांना समान अधिकार मिळावेत यासाठी चळवळ उभी केली जात आहे तर आपल्याकडे महिलांनी कसे राहायचे, तिने कोणते कपडे घालायचे, कसे कपडे घालायचे यावर चर्चा केली जाते. प्रश्न महिलांनी कसे आणि कोणते कपडे घालायचा हा नसून प्रश्न त्यांच्या निवडीच्या स्वातंत्र्याचा आणि महिलांच्या मानवी हक्काचा आहे. हे हक्क कोणीही हिरावून घेऊ नये. महिला गुडघ्यावर फाटलेली जीन्स घालतात, तोकडे कपडे घालतात म्हणून त्यांच्यावर लैंगिक अत्याचार होतात असा तर्क लढवला जातो. महिला संध्याकाळी बाहेर फिरायला जातात म्हणून त्यांच्यावर बलात्कार होतात असाही दावा तथाकथित संस्कृती रक्षक करतात पण ते सोयीस्करपणे हे विसरतात की आपल्या देशात अंगभर कपडे घातलेल्या साठ सत्तर वर्षाच्या वृद्धेवर देखील बलात्कार होतो. विकृत मानसिकता असलेले लोक अंगभर कपडे घातलेल्या महिलांकडे देखील विकृत नजरेने पाहतात. अंगभर कपडे असोत की तोकडे कपडे असोत ज्यांची मानसिकता विकृत आहे त्या नराधमांना महिला केवळ भोगवस्तू वाटते. महिलांच्या कपड्यांवर भाष्य करण्याऐवजी ही पुरुषी मानसिकता बदलली तर देशात महिला अत्याचाराच्या घटना घडणार नाही.

लेखक
श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

# ‘खडकवासला जलाशय रक्षण’ अभियान
## २३ व्या वर्षीही शतप्रतिशत यशस्वी !



### निसर्गाचा ऱ्हास न होता त्याचे संरक्षण झाले पाहिजे !
**– भीमराव अण्णा तापकीर, भाजप आमदार, खडकवासला मतदारसंघ**

धूलिवंदन आणि रंगपंचमी या दिवशी आयोजित केले जाणारे खडकवासला जलाशय रक्षण अभियान सलग 23 व्या वर्षीही शतप्रतिशत यशस्वी झाले. हिंदु जनजागृती समिती, खडकवासला ग्रामस्थ आणि समविचारी संघटना यांच्या वतीने हे अभियान 14 मार्च या दिवशी राबवण्यात आले. या वेळी उपस्थित सर्वांनी खडकवासला जलाशयाभोवती मानवी साखळी करून जनतेचे प्रबोधन केले आणि धरणात उतरण्यास मज्जाव केला. धूलिवंदन आणि रंगपंचमी या दिवशी रंग खेळून जलाशयात उतरणे, हिंदु सणांच्या नावाखाली होणारे अपप्रकार थांबविणे, तसेच हिंदूंना धर्मशास्त्र माहिती व्हावे यासाठी हिंदु जनजागृती समिती प्रारंभीपासून प्रबोधन करत आहे. भगवान श्रीकृष्णाच्या प्रतीमा पूजनाने अभियानाला प्रारंभ झाला. या प्रसंगी खडकवासला मतदार संघाचे आमदार श्री. भीमराव (अण्णा) तापकीर यांनी नारळ वाढवून अभियानाचे उद्घाटन केले.

या वेळी इतिहास अभ्यासक डॉ. नंदकिशोर मते, खडकवासला मतदारसंघाचे भाजप युवा मोर्चा अध्यक्ष श्री. सारंग नवले, नागरीक सोशल फाउंडेशनचे ज्ञानेश देसाई, नांदेड सिटी चे मुख्य संचालक अधिवक्ता नरसिंह लगड, यासह नांदेड विभागाचे श्री. प्रकाश गोरे, अधिवक्ता प्रदीप देशमुख, छावा चित्रपटाचे पटकथा लेखक श्री उन्मन बाणकर, हिंदुराष्ट्र समन्वय समितीचे श्री. सचिन घुले, हिंदु जनजागृती समितीचे श्री. पराग गोखले यांसह अन्य मान्यवर याप्रसंगी उपस्थित होते. धरणाच्या पाण्यात कोणी उतरू नये, तसेच पाण्याचे प्रदूषण करू नये यासाठी समिती निस्वार्थपणे हे कार्य करत आहे. सर्व नागरिकांनी जलस्रोत सुरक्षित राहतील यासाठी प्रयत्नशील राहावे असे आवाहन खडकवासला मतदारसंघाचे भाजप आमदार भीमराव अण्णा तापकीर यांनी केले.

हिंदु जनजागृती समिती, खडकवासला ग्रामस्थ, पोलीस, प्रशासन, पाटबंधारे विभाग आणि समविचारी संघटना यांच्या वतीने हे अभियान राबवण्यात आले. या वेळी 200हून अधिक कार्यकर्ते, जिज्ञासू, धर्मप्रेमी उपस्थित होते. या अभियानासाठी स्थानिक ग्रामस्थ आणि हिवरे, सासवड, नसरापूर, शिरवळ, भोर, नवलेवाडी, दौंड, पारगाव, भोसरी, मोशी, तसेच पिंपरी चिंचवड येथून आलेले धर्मप्रेमी सहभागी झाले होते. प्रबोधनानंतर अनेक नागरिकांनी अभियानाचे विशेष कौतुक केले. पोलीस-प्रशासनाचेही या अभियानाला उत्तम सहकार्य लाभले. धूलिवंदनाच्या दिवशी रंग खेळून नियमाचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांवर पोलिसांनी कारवाई केली. अशाच प्रकारे रंगपंचमीच्या दिवशी म्हणजे 19 मार्चलाही हे अभियान राबवण्यात येणार आहे. यामध्ये सहभागी होण्याचे आवाहन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

### अखिल भारतीय ब्राह्मण महासंघाच्या
# उद्योजक सेल जिल्हाध्यक्ष पदी प्रीती दीक्षित

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



कल्याण : अखिल भारतीय ब्राह्मण महासंघाच्या उद्योजक सेलच्या जिल्हाध्यक्ष पदी प्रीती दिक्षित यांची नियुक्ती ठाणे जिल्हाध्यक्ष शशांक खेर यांच्या नेतृत्वात कल्याण डोंबिवली जिल्हाध्यक्ष महेश केळकर व प्रदेश सचिव स्मृती आठवले यांच्या उपस्थितीत नव कार्यकारिणी डोंबिवली येथे जाहीर करण्यात आली. या प्रसंगी डोंबिवली शहर अध्यक्ष तळवलकर, रूपक पांडे, धनश्री धर्माधिकारी, स्मिता डोरले, किशोर भंडारी, संदीप भावे, वर्षा पाठक, प्राची देशमुख, अलका तेंडुलकर, गिरीष खटी, मनोज उपाध्याय, गायत्री करंदीकर, अबोली खाडिलकर, विद्या इनामदार आदी पदाधिकारी उपस्थित होते.

अखिल भारतीय ब्राह्मण महासंघ आपल्या पसरलेल्या शाखांच्या मार्फत संपूर्ण देशात ब्राह्मण उत्कर्ष संबंधित कामात कार्यरत आहे. महाराष्ट्रात देखील जिल्हा ते तालुका पातळी पर्यंत महासंघाचे जाळे पसरत जात आहे. अशा या संघटनेच्या उद्योजक आघाडी जिल्हाध्यक्ष पदी प्रीती दिक्षित यांची निवड करण्यात आली आहे. अखिल भारतीय ब्राह्मण महासंघाचे काम जोमाने करत महासंघाचे वार्षिक उत्सव तसेच समाज उपयोगी कार्यक्रमात सहभाग नोंदवून संघटना वाढीसाठी सक्रिय काम करणार असल्याचे प्रीती दिक्षित यांनी सांगितले.

# विधायक कामांमुळेच सर्वांगीण विकास होतो
## - पत्रकार विजय गायकवाड

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



झिडके-अंबाडी : भिवंडी तालुक्यातील ग्रामीण भागातील जनतेच्या विकासासाठी " झिडके-अंबाडी " हा नवीन प्रस्तावित ग्रामीण तालुका गेल्या 35 वर्षांपासून प्रलंबित आहे, या ग्रामीण भागातील जनतेच्या मागणीला आता कुणी रोखणार नाही,कारण शासनाला सुद्धा या बाबतीत चांगलीच कल्पना आहे ,म्हणूनच शासनाने झिडके-अंबाडी या ग्रामीण तालुक्याची निर्मिती होण्यासाठीच सन -1992 ते 1994 या कालावधीत तत्कालीन " महसुल कोकण आयुक्त जी.बी.पिंगुळकर " यांची नियुक्ती करून,तालुका निर्मितीसाठी प्रस्ताव तयार करण्यास सांगितले, व तो " पिंगुळकर समिती" अहवाल म्हणून भिवंडी ग्रामीण भागातील जनतेला माहिती आहे.या अहवालाची अंमलबजावणी होण्यासाठीच " माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ भिवंडी तालुका " यांच्या पुढाकारातून तालुक्याची मागणी करण्यासाठी ग्रामीण भागातील सरपंच,उपसरपंच,सदस्य,पोलिस पाटील तसेच सर्व पक्षीय कार्यकर्ते यांची सहविचार सभा " रेणुका विद्यालय झिडके " येथे रविवार दिनांक- 16/03/2025 रोजी संपन्न झाली.या सहविचार सभेच्या अध्यक्षीय भाषणात आपले विचार व्यक्त करताना पत्रकार,विजय गायकवाड यांनी विविध विषयांवर आपले मनोगत सादर करून उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले.

या सहविचार सभेसाठी निमंत्रित प्रमुख मार्गदर्शक म्हणून सेवानिवृत्त तहसीलदार सु.ल.पाटील उपस्थित राहून त्यांनी अत्यंत सविस्तर अशी प्रशासकीय माहीती सदर सभेत उपस्थित नागरिकांना देऊन " झिडके-अंबाडी " या नवीन ग्रामीण तालुक्याच्या दृष्टीकोनातून आवश्यक अशी माहिती सादर करून,या कामी सर्वतोपरी योग्य असे मार्गदर्शन व योगदान देण्याचे यावेळेस जाहीर केले. या सहविचार सभेत उपस्थितांपैकी नितीन पाटील (झिडके),अशोक लाटे (वेढेपाढा),आत्माराम पाटील (वेढेगाव),मिलिंद भोईर (अंबाडी) आदिंनी आपली मनोगते व्यक्त केली.तसेच सभा मंचकावरील मान्य वर संजय पाटील (वेढेगाव),नामदेव पाटील (पहारे),सी.एस्.पाटील (अस्नोली),आर.जी.पाटील (उंबरपाडा-अंबाडी),सुदाम पाटील (वेढेगाव),कॉ. रमेश जाधव (पाच्छापूर),चंद्रकांत भोईर (वेढेपाढा),के.डी.पाटील (झिडके)यांनी आपले बहुमोल विचार उपस्थितांसमोर ठेवून नवीन ग्रामीण तालुक्यासाठी हवे ते सहकार्य देण्याची तयारी दर्शविली.सदर कार्यक्रमात सर्व उपस्थितांना चहापान व्यवस्था सामाजिक कार्यकर्ते विलास श्रीरंग पाटील झिडके यांच्याकडून करण्यात आली.सदर सभा अत्यंत सुव्यवस्थित पार पडण्यासाठी " माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाचे पदाधिकारी" विजय गायकवाड,शांताराम पाटील,नवसु पाटील,शामराव भोईर,डी. बी.पाटील,दशरथ पाटील,आत्माराम पाटील,प्रकाश पाटील,बबन तनपुरे,संभाजी पाटील,किशोर पाटील,आदिंनी विशेष मेहनत घेतली,त्यामुळेच या सहविचार सभेसाठी सुमारे जवळपास 100 प्रातिनिधिक स्वरूपात ग्रामीण भागातून नागरिक उपस्थित होते.सदर सभेचे प्रास्ताविक शामराव भोईर व सूत्रसंचालन सामाजिक कार्यकर्ते प्रदीप जाधव आणि आभार प्रदर्शन शामराव भोईर यांनी केले.अशा प्रकारे अत्यंत उत्साहपूर्ण व मुद्देसूद विषयांवर सविस्तर चर्चा करून सभेची सांगता झाली.

### मानव जातीचे कल्याण व विश्वशांतीसाठी
# वज्रेश्वरी येथे महासत्संग सोहळा

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पडघा : मानव जातीच्या कल्याण व विश्वशांतीसाठी भिवंडी तालुक्यातील श्री क्षेत्र वज्रेश्वरी येथे एका ऐतिहासिक सत्संग सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. आखील भारतीय श्री स्वामी समर्थ सेवा मार्गाच्या वतीने दिनांक १८ मार्च २०२५ रोजी श्री क्षेत्र वज्रेश्वरी येथे परमपूज्य गुरु माऊली श्री आण्णासाहेब मोरे यांच्या प्रमुख उपस्थितीत ऐतिहासिक महासत्संग सोहळयाचे आयोजन करण्यात आलेले आहे. अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ सेवा मार्गाचे प्रमुख परमपूज्य गुरु माऊली अण्णासाहेब मोरे हे गेल्या पन्नास वर्षापेक्षा अधिक काळापासून देशातील-परदेशातील कार्यान्वित असलेल्या श्री स्वामी समर्थ सेवा केंद्रांच्या माध्यमातून आदर्श कुटुंब व्यवस्था व सशक्त समाज निर्माण करण्यासाठी सातत्याने कार्य करीत आहेत.सेवामार्गाच्या ग्राम व नागरी विकास सक्षमीकरण अभियान अंतर्गत सुसंस्कृत व राष्ट्रभिमानी समाजव्यवस्था निर्माण होण्यासाठी मुलांसाठी तरुणांसाठी मूल्यशिक्षण- राष्ट्रभक्ती, व्यसनमुक्ती अभियान, भारतीय संस्कृती जतन-संवर्धन, महिला सशक्तीकरण, कृषी मेळाव्यातुन शेतीविषयक मार्गदर्शन, कायदा जागरूकता अभियान, वेदग्रंथाचे वैज्ञानिक संशोधन,



विना-हुंडा विवाह पद्धती प्रोत्साहन, नैसर्गिक आपत्ती मदतकार्य यासारख्या अनेक विषयांवर सातत्यपूर्ण जनप्रबोधन करीत असतात सेवा मार्गाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमातून समाजातील प्रश्नांवर जागरूकता निर्माण करताना अनेक विश्वविक्रम घडले गेले असून यामध्ये व्यसनमुक्तीचा संदेश देणारी मानवी साखळी तयार करणे, विश्वविक्रमी संख्येत पर्यावरणपूरक शाडू मातीचे गणपती बनविणे, प्लास्टिकमुक्त आकाशकंदील बनविणे, मुलांच्या बौद्धिक क्षमतेत वाढ करणाऱ्या स्तोत्र-मंत्रांचे सामूहिक पठण तसेच छत्रपती शिवरायांचे ७५० पेक्षा जास्त मातीचे गडकिल्ले बनवून संवर्धनाचा संदेश देणे आदी उपक्रमांचा यात समावेश आहे. "वृद्धाश्रममुक्त भारत" या विशेष अभियानातून पालक-पाल्याना समुपदेशन केले जात असून वृद्धाश्रमाच्या नव्याने भिंती उभारल्या जाऊ नयेत यासाठी ही मूल्यसंस्कार विभागातुन पालक-पाल्यांचे समुपदेशन केले जात आहे. या समाज प्रबोधनाची शृंखलेत श्री क्षेत्र वज्रेश्वरी येथे उपक्रमाचा समावेश करण्यात आला आहे. दिनांक १८ मार्च रोजी सकाळी ८ ते ४ या वेळेत श्री क्षेत्र वजेश्वरी या ठिकाणी सेवेकरी परिवाराच्या सहभागातून मानव जातीचे कल्याण व विश्वशांतीसाठी ऐतिहासिक महासत्संग सोहळयाचे आयोजन करण्यात आलेले आहे. मुंबई विभागातील श्री वज्रेश्वरी मातेचे हे तीर्थक्षेत्र विशेष प्रसिद्ध आहे. या दिवशी राज्यातील व परराज्यातील सेवेकरी परिवाराच्या सहभागातून श्री दुर्गासप्तशती ग्रंथाचे सामुदायिक वाचन करण्यात येणार असून श्री यंत्र पूजनासह मानव जातीचे कल्याण व विश्वशांतीसाठी सामुदायिक प्रार्थना करण्यात येणार आहे. या दिवशी अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ सेवा मार्गाचे प्रमुख परमपूज्य गुरुमाऊली श्री आण्णासाहेब मोरे यांचे जाहीर हितगुज व मार्गदर्शन संपन्न होणार असून या राष्ट्रीय महासत्संग सोहळयास नागरीकांनी मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन नियोजन समितीच्या वतीने करण्यात आलेले आहे.

**अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ सेवा मार्गाचे प्रमुख परमपूज्य गुरु माऊली अण्णासाहेब मोरे हे गेल्या पन्नास वर्षापेक्षा अधिक काळापासून देशातील-परदेशातील कार्यान्वित असलेल्या श्री स्वामी समर्थ सेवा केंद्रांच्या माध्यमातून आदर्श कुटुंब व्यवस्था व सशक्त समाज निर्माण करण्यासाठी सातत्याने कार्य करीत आहेत.**

जीवनदीप शैक्षणिक संस्था,पोई संचलित
जीवनदीप कौशल्य विकास केंद्र गोवेली
कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग संचलित
प्रवेश सुरु! प्रवेश सुरु! प्रवेश सुरु!
१ बांधकाम पर्यवेक्षक (कोड नं.३०४२०२) कालावधी १ वर्ष
२ पॅथोलॉजी टेक्नीशियन (कोड नं.२०१२३०) कालावधी १ वर्ष
३ जनरल नर्सिंग आणि मिडवाइफरी असिस्टंट (GNMA) (कोड नं.२०१२३७) कालावधी १ वर्ष
४ डिप्लोमा कोर्स इन मेडिकल लॅब टेक्निशियन (DMLT) (कोड नं.२०१४०४) कालावधी २ वर्ष
५ सिक्युरिटी ॲण्ड फायर प्रिव्हिजन प्रशिक्षण (कोड नं.४११११२४) कालावधी ६ महिने
पात्रता : १० वी / १२ वी / पदवी
संपर्क : जीवनदीप कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय गोवेली, पो.रायते, ता.कल्याण, जि.ठाणे
Call : 8108559566 / 9158518832 / 9619188558

### खासदार नरेश म्हस्के यांच्या संसदेतील तक्रारीनंतर

# अश्लील कंटेंट प्रसारित करणारे १८ ओटीटी प्लॅटफॉर्म ब्लॉक

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**
**वृत्तसेवा**

**ठाणे** - सोशल मीडिया, डिजिटल मीडिया आणि ओटीटी प्लॅटफॉर्मवर सध्या अश्लिलतेचा कहर सुरु आहे. यामुळे लहान मुलांवर चुकीचे संस्कार घडत आहेत. भारतीय संस्कृतीला या माध्यमांमुळे बाधा पोहचत आहे.

माहिती प्रसारण मंत्रालयाने या माध्यमांना अधिक कठोरपणे लगाम लावावा, अशी मागणी ठाणे लोकसभेचे खासदार नरेश म्हस्के यांनी संसदेत शून्य प्रहर मध्ये केली होती. त्यानंतर आतापर्यंत १८ ओटीटी प्लॅटफॉर्म ब्लॉक केले असल्याची माहिती संसदीय कामकाज व माहिती आणि प्रसारण राज्यमंत्री डॉ. एल. मुरुगन यांनी दिली आहे.

युट्यूबवरील एका कार्यक्रमात यूट्युबर रणवीर अलाहाबादिया याने आई आणि वडिलांसंदर्भात अतिशय अश्लाघ्य भाषेत संवाद साधला होता. यामुळे खासदार नरेश म्हस्के यांनी संसदेत संताप व्यक्त करत तात्काळ अलाहाबादियावर गुन्हा दाखल करण्याची तसेच ओटीटी प्लॅटफॉर्मवर अधिक निर्बंध आणण्याची मागणी संसदेत केली होती.

या विषयाच्या अनुषंगाने संसदीय कामकाज व माहिती आणि प्रसारण राज्यमंत्री



डॉ. एल. मुरुगन यांनी या संदर्भात १० मार्च रोजी खासदार नरेश म्हस्के यांच्याशी संपर्क साधला आणि केंद्र शासन ओटीटी प्लॅटफॉर्मवर अजून कडक निर्बंध आणण्यासाठी कटिबद्ध असल्याची ग्वाही दिली. केंद्र सरकारने माहिती तंत्रज्ञान कायदा २००० अंतर्गत २५ फेब्रुवारी २०२१ रोजी माहिती तंत्रज्ञान (अंतरिम मार्गदर्शक तत्त्वे आणि डिजिटल मीडिया आचारसंहिता) नियम २०२१ (आयटी नियम २०२१) ची अधिसूचना जारी केली आहे. या नियमांच्या भाग-iii मध्ये ऑनलाइन जनरेटेड कंटेंट (ओटीटी प्लॅटफॉर्म) च्या प्रकाशकांसाठी आचारसंहिता प्रदान केली आहे.

सध्या लागू असलेल्या कोणत्याही कायद्याद्वारे प्रतिबंधित असलेली कोणतीही कंटेंट प्रसारित करू नये, योग्य काळजी आणि विवेक बाळगावा आणि ते नियमांच्या अनुसूचीमध्ये दिलेल्या सामान्य निर्देशांनुसार वयानुसार कंटेंटचे 5 श्रेणींमध्ये स्वयं-वर्गीकरण करावे, मुलांसाठी वयानुसार अनुचित सामग्री प्रतिबंधित करण्यासाठी ओटीटी प्लॅटफॉर्मने पुरेसे संरक्षणात्मक उपाय करावेत.

असे नियम असल्याचे माहिती आणि प्रसारण राज्यमंत्री डॉ. एल. मुरुगन यांनी म्हटले आहे. त्यानुसार अश्लील आणि इतर बेकायदेशीर सामग्री प्रकाशित केल्याबद्दल १८ ओटीटी प्लॅटफॉर्मना ब्लॉक केले असल्याचे माहिती आणि प्रसारण राज्यमंत्री डॉ. एल. मुरुगन यांनी सांगितले.

## किल्ले रायगडावरून हजारो शिवज्योती रवाना



**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**महाड, ता. १७ :** जय भवानी, जय शिवाजीचा जयघोष, भगवेमय झालेले रस्ते आणि चौक, धगधगत्या शिवज्योती हाती घेऊन धावणारे मावळे, खांद्यांवर आणि वाहनांवर फडकणारे भगवे ध्वज अशा उत्साही वातावरणात महाड व किल्ले रायगडावर सोमवारी तिथीनुसार शिवजयंती साजरी करण्यात आली.

शिवरायांच्या पायी नतमस्तक होऊन शिवज्योती आपल्या गावी नेण्यासाठी रायगड किल्ल्यावर शिवप्रेमींनी गर्दी केली होती. महाड, माणगाव, मंडणगड, गोरेगाव, चिपळूण, खेड, पोलादपूर, भोर, पुणे, सातारा अशा विविध ठिकाणी सुमारे १२०० शिवज्योती नेण्यात आल्या. आपल्या गावात ही शिवज्योती स्थापन करून शिवजयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

रायगड किल्ला तसेच रायगडावरून आणलेल्या शिवज्योतींमुळे किल्ल्याकडे जाणारा रस्ता तसेच शहरातील अनेक रस्ते भगवेमय झाले होते. अनेक जण दुचाकीवर, खांद्यावर भगवा ध्वज घेऊन रायगडहून आपल्या गावात जाताना दिसत होते. अनेक वाहनांवरही भगवे ध्वज लावण्यात आले होते.

शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात शिवज्योतींचे विविध मंडळांकडून स्वागत करण्यात आले. या ठिकाणी येणाऱ्या शिवप्रेमींसाठी चहा-नाश्त्याची सोय करण्यात आली होती. सकाळपासूनच शिवज्योती घेऊन येणारी मंडळी छत्रपती शिवाजी महाराज चौकात दाखल होत असल्याने मोठी गर्दी उसळली होती. शिवप्रेमी तसेच महिलांनी या ठिकाणी रिंगण धरून लेझीम नृत्य केले.

हातामध्ये मोठ-मोठे भगवे ध्वज तसेच जाणता राजाचे ध्वज उंच फडकवले जात होते. गावागावातून टेम्पो, ट्रक यामध्ये शिवप्रेमी गर्दी भरून आपल्या गावांना शिवज्योती घेऊन जात होते. वाहनांवर लावलेले मोठ-मोठे ध्वज तसेच शिवघोषणांनी सकाळपासूनच महाडचा परिसर दणाणून गेला होता. महाड शहरातील चौकाचौकांत तसेच गाव-वाड्यांवर शिवजयंती साजरी करण्यात आली. महाडमधील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला रोषणाई करण्यात आली होती. महाडमध्ये छत्रपती शिवाजी महाराज सार्वजनिक जयंती उत्सव मंडळाच्या वतीने शिवजयंती उत्सव साजरा करण्यात आला.



### मिरा-भाईंदर महापालिकेतील

## पदभरतीसाठी 'टीसीएस' कंपनीची नियुक्ती

### अनेक महिने रखडलेल्या भरती प्रक्रियेला येणार वेग

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**भाईंदर, ता. १७ (बातमीदार)**

मिरा-भाईंदर महापालिकेतील पदभरतीसाठी आता 'टीसीएस' या कंपनीची नियुक्ती करण्यात आली आहे. याआधी ही भरती करण्यासाठी 'आयबीपीएस' कंपनीची नियुक्ती करण्यात आली होती, परंतु पदभरती प्रक्रियेत कंपनीकडून महापालिकेला योग्य तो प्रतिसाद मिळत नसल्याने त्यांची नियुक्ती रद्द करून आता 'टीसीएस'ची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यामुळे गेले अनेक महिने रखडलेल्या भरती प्रक्रियेला वेग येणार आहे.

महापालिकेत रिक्त असलेल्या विविध ३४० पदांची भरती करायची आहे. त्यापैकी पहिल्या टप्प्यात कनिष्ठ अभियंता, लिपिक, सर्व्हेअर व प्लंबर आदी ४५ पदे भरण्याचा निर्णय महापालिकेने घेतला आहे. राज्य सरकारच्या आदेशानुसार पदभरतीसाठी 'टीसीएस' अथवा 'आयबीपीएस' या कंपनीची नियुक्ती करणे आवश्यक आहे. त्यानुसार महापालिकेने गेल्या वर्षी सप्टेंबरमध्ये 'आयबीपीएस' या कंपनीची निवड करून त्यांना ४५ पदे भरण्याबाबतचा मसुदा पाठविण्यात आला. भरती प्रक्रिया तातडीने सुरू करण्याबाबत महापालिकेकडून कंपनीकडे वारंवार पाठपुरावा करण्यात आला, मात्र कंपनीकडून पुरेसा प्रतिसाद देण्यात आला नाही. त्यामुळे भरती प्रक्रिया लांबणीवर पडत गेली.

पदभरतीची प्रक्रिया जाणून घेण्यासाठी महापालिका अधिकाऱ्यांनी गेल्या महिन्यात पनवेल महापालिकेला भेट दिली. त्या महापालिकेने भरती प्रक्रिया राबविण्यासाठी टीसीएस कंपनीची नियुक्ती केली असून, भरती प्रक्रिया पूर्ण केली. निवड झालेले कर्मचारी, अधिकारी कामावर हजरदेखील झाल्याचे निदर्शनास आले. पनवेल पालिकेने 'टीसीएस' सोबत केलेल्या करारनाम्यात महापालिका व कंपनीची जबाबदारी निश्चित केली होती. त्यामुळे भरती प्रक्रिया जलद गतीने पूर्ण झाल्याचे स्पष्ट झाले.

**करारनाम्यात तफावत**

**मिरा-भाईंदर महापालिकेने 'आयबीपीएस' सोबत भरती प्रक्रियेसाठीच्या सामंजस्य करारनाम्याचा मसुदा तपासला असता त्यात आणि पनवेल महापालिकेने केलेल्या करारनाम्यात बऱ्याच बाबींमध्ये तफावत दिसून आली. त्यामुळे महापालिकेने करारनाम्यात बदल करण्यासाठी कंपनीशी संपर्क साधला, मात्र कंपनीकडून कोणताही प्रतिसाद मिळाला नाही.**

---

**ठरावाला मंजुरी**

**'टीसीएस'ने पनवेल महापालिकेची पदभरती यशस्वीरित्या पूर्ण केल्याने अखेर महापालिकेने 'टीसीएस'ची निवड करण्याचा निर्णय घेतला. 'आयबीपीएस' सोबत महापालिकेचा सामंजस्य करारनामा झाला नसल्यामुळे अखेर त्याजागी 'टीसीएस'ची नियुक्ती करण्याचा ठराव नुकताच मंजूर केला आहे.**

## पालकमंत्रिपदाच्या वादामुळे रखडलेला रायगड जिल्हा नियोजन आराखडा अखेर मंजूर

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**अलिबाग, ता. १७ :** पालकमंत्रिपदाच्या वादामुळे रखडलेला रायगड जिल्ह्याचा वार्षिक विकास आराखडा अखेर मंजूर झाला आहे. २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी ४८१ कोटींची तरतूद करण्यात आली आहे. गतवर्षीच्या तुलनेत जवळपास ४९ कोटी रुपयांचा वाढीव निधी जिल्ह्यातील विकासकामांसाठी उपलब्ध होणार आहे. गेल्या वर्षी ४३२ कोटींचा निधी उपलब्ध झाला होता. जिल्ह्यातील सर्वच प्रमुख पक्ष सत्तेत असल्याने जास्तीत जास्त विकास निधी मिळवण्यासाठी चढाओढ सुरू आहे. राज्य सरकारने ३६६ कोटी रुपयांची मर्यादा घालून दिली होती; परंतु जिल्हा नियोजन विभागाकडे विविध यंत्रणांकडून ९३९ कोटी रुपयांच्या कामांची मागणी करण्यात आली होती. त्यामुळे जिल्हा प्रशासनाने ३६६ कोटी रुपयांचा वार्षिक आराखडा मंजूर करून तो मान्यतेसाठी राज्यस्तरीय समितीकडे पाठवला होता. उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय समितीची बैठक झाली. या वेळी रायगड जिल्ह्याने पाठवलेल्या आराखड्यात ११५ कोटी रुपयांची वाढ करून ४८१ कोटींचा विकास आराखडा मंजूर करण्यात आला.

**२०२४-२०२५ वर्षासाठी ४३२ कोटी रुपयांचा रायगड जिल्हा विकास आराखडा मंजूर करण्यात आला होता. आता सर्व निधी प्राप्त झाला आहे. २७२ कोटी रुपये वितरित करण्यात आले आहेत. हा सर्व निधी आठवडाभरात वितरित केला जाईल.**

**- जयसिंग मेहेत्रे, नियोजन अधिकारी, रायगड**

आदिवासी उपाययोजनांसाठी ४१ कोटी ६० लाखांची तरतूद करण्यात आली आहे, तर अनुसूचित जातीसाठी २८ कोटींचा विकास आराखडा मंजूर करण्यात आला आहे.

**पालकमंत्रिपदाच्या वादाचा अडसर**

रायगडच्या पालकमंत्रिपदावरून शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये वाद सुरू आहे. पालकमंत्रिपदासाठी दोन्ही पक्ष आग्रही आहेत. शिवसेनेच्या विरोधानंतर आदिती तटकरे यांच्या पालकमंत्रिपदाला स्थगिती दिली. पालकमंत्री नसल्याने रायगड जिल्हा नियोजन समिती अद्यापही स्थापन झालेली नाही. परिणामी विकास आराखड्याला नियोजन समितीची मंजुरी मिळू शकलेली नाही. त्यामुळे जिल्हा प्रशासनाने आराखडा तयार करून त्याला अर्थ विभागाची मंजुरी दिली.

## कळवा, मुंब्रा, दिवा परिसरात उद्या पाणी नाही

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे :** एमआयडीसीच्या जांभूळ जलशुद्धीकरण केंद्रात तातडीची दुरुस्तीचे काम हाती घेण्यात येणार आहे. या कामामुळे कळवा, मुंब्रा, दिवा परिसराचा पाणी पुरवठा उद्या, मंगळवारी बंद राहणार आहे. या बंदनंतर पाणीपुरवठा सुरू झाल्यावर पुढील काही तास कमी दाबाने पाणीपुरवठा होणार आहे. यामुळे या भागातील नागरिकांना पाणी टंचाई समस्येला सामोरे जावे लागण्याची शक्यता आहे.

## उन्हाच्या काहिलीने मुरबाड तालुक्यात ताडगोळ्यांना मागणी

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**टोकावडे, ता. १७ (बातमीदार) :** ठाणे जिल्ह्याचे तापमान ४० अंश डिग्री सेल्सिअस वाढले आहे. मार्चपासूनच उन्हाचा पारा वाढू लागल्याने आरोग्याच्या तक्रारी वाढू लागल्या आहेत. त्यामुळे सध्याच्या हंगामात बाजारात ताडगोळ्यांना मागणी वाढल्याचे चित्र आहे. उन्हापासून बचावासाठी ताडगोळेसारखी शीतफळे खरेदी करत आहेत. अतिशय मऊ आणि रसदार ताडगोळे चवीला गोड असून, प्रकृतीला थंड असतात. ताडगोळ्यातील पोषक घटकांमुळे मोठ्या प्रमाणात मागणी वाढली आहे. तसेच त्यांच्या विक्रीतून उन्हाळ्यामध्ये रोजगार मिळत आहे. सध्या ताडगोळे कमी प्रमाणात मिळत असल्याने बाजारात १२० ते १४० रुपये डझनाप्रमाणे विकले जात आहेत. उन्हाळ्यात वाढत्या तापमानामुळे शरीरात पाणी कमी झाल्याने अशक्तपणा जाणवतो. त्यामुळे या काळात आहारात विविध फळांचा समावेश असावा, असे तज्ज्ञ सांगतात.

## उल्हासनगरमध्ये टेम्पोत आढळला मृतदेह

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**उल्हासनगर:** उल्हासनगरात खेमानी परिसरात स्मशानभूमीच्या रस्त्यावर कडेला उभ्या असलेल्या एका टेम्पोत मृतदेह आढळल्याने परिसरात चांगलीच खळबळ उडाली आहे. अचानक समोर आलेल्या या मृतदेहाने स्थानिक नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. ही हत्या आहे की आत्महत्या, याचा शोध घेण्यासाठी पोलिसांचा तपास सुरू आहे.

उल्हासनगर शहर हे व्यापारी शहर म्हणून परिचीत आहे. शहरात अनेक लहान मोठे उद्योग असल्याने त्याकामी शहरात हजारो लहान मोठ्या वाहनांची वाहतूक सुरू असते. अनेकदा कच्चा माल उचलण्यासाठी आणि उतरवण्यासाठी माल वाहनांना वाट पाहावी लागते. अनेकदा अनेक वाहने रस्त्याच्या कडेला उभी असतात. असाच एक टेम्पो बराच वेळ रस्त्याच्या कडेला उभा असल्यामुळे येणाऱ्या जाणाऱ्या लोकांचे लक्ष वेधले गेले.

काहींनी टेम्पोच्या पडद्याच्या मागे डोकावून पाहिले असता, त्यांना आत एक मृतदेह असल्याचे आढळून आले. नागरिकांनी तात्काळ याची माहिती पोलिसांना दिली. पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी पोहोचून मृतदेह ताब्यात घेतला. हा मृतदेह शवविच्छेदनासाठी शासकीय मध्यवर्ती रुग्णालयात पाठवण्यात आला.

प्राथमिक तपासात मृतदेहाच्या शेजारी उत्तर प्रदेशातील गोंठा ग्रामपंचायतचे निवासी प्रमाणपत्र सापडले असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. त्या प्रमाणपत्रावर संतोष प्रभुनाथ प्रजापती असे नाव असल्याचेही पोलिसांनी सांगितले आहे. त्यामुळे पोलिसांनी या नावाचा तपास सुरू केला आहे. पोलिसांनी घटनास्थळावरून महत्त्वाचे पुरावे गोळा केले असून, मृत व्यक्तीच्या ओळखीबाबत अधिकृत तपशील शोधला जातो आहे. लवकरच या घटनेचा उलगडा होण्याची शक्यता आहे. मात्र मृतदेहाजवळ सापडलेल्या प्रमाणपत्रामुळे अनेक तर्कवितर्क लढवले जात आहेत. मृतदेहाजवळ आढळलेले प्रमाणपत्र हे मृत व्यक्तीचेच आहे की हे कुणी हेतुपुरस्सर ठेवले आहे, याचा प्रश्न चर्चिला जातो आहे. त्याच दिशेने पोलिसांचा तपास सुरू आहे. तसेच ही आत्महत्या आहे, हत्या आहे याबाबतच तर्तवितर्क लढवले जात आहेत.

## नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचे उद्घाटन दोन महिने लांबणीवर?



**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**नवी मुंबई :** नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पाचे उद्घाटन जून महिन्यात होईल, असे अदानी समूहाचे अध्यक्ष गौतम अदानी यांनी रविवारी जाहीर केले. विमानतळाला भेट देऊन त्यांनी सुरू असलेल्या कामांची पाहणी केली. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचे (एनएमआयए) काम वेगात सुरू असल्याबाबत अदानी यांनी समाधान व्यक्त केले. अदानी एअरपोर्ट होल्डिंग्स लिमिटेडचे मुख्य कार्यकारी अधिकारी अरुण बन्सल, तसेच नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ लिमिटेडचे कार्यकारी मुख्य अभियंता कॅप्टन बी.व्ही.जे.के. शर्मा, एनएमआयए प्रकल्पातील भागीदार कंपन्या आणि अन्य हितसंबंधी संस्थांचे प्रतिनिधी तसेच डॉ. प्रीती अदानी, जीत अदानी, दिवा अदानी यावेळी उपस्थित होते. विमानतळामुळे नवी मुंबईचा औद्योगिक आणि आर्थिक विकास होणार असून विमानतळ कार्यान्वित झाल्यानंतर संपूर्ण परिसराला मोठी आर्थिक चालना मिळेल, असा विश्वास अदानी यांनी व्यक्त केला.

'सिडको'चे व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांनी १७ विमानतळाची पाहणी केल्यानंतर 'एक्स' समाजमाध्यमावर त्यांनी जूनमध्ये विमानतळ सुरू होईल, असे स्पष्ट केले. या विमानतळामुळे मुंबईच्या छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावरील ताण कमी होणार आहे. एप्रिलला विमानतळातून देशांतर्गत वाहतूक सुरू होईल, अशी घोषणा पूर्वी केली होती. त्यानंतर आपल्या अर्थसंकल्पीय भाषणात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी एप्रिलअखेरचा मुहूर्त दिला होता. मात्र अदानी यांच्या रविवारच्या दौऱ्यानंतर आता विमानतळाचे उद्घाटन दोन महिने लांबणीवर गेल्याचे मानले जात आहे.

महाराष्ट्र शासन

## महाराष्ट्र जीवन प्राधिकरण जल व्यवस्थापन विभाग अंबरनाथ

### -: निविदा सूचना :-

कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, साई विभाग, रोड नं. ८२, अंबरनाथ (पूर्व) यांनी खालील कामांसाठी दोन लिफाफा प्रणालीतील सीलबंद निविदा फॉर्म आमंत्रित केले आहे. रिक्त निविदा फॉर्म कार्यकारी अभियंता, म.जी.प्रा.ज.व्य. विभाग, अंबरनाथ या कार्यालयात दिनांक १९/०३/२०२५ ते २४/०३/२०२५ पर्यंत कार्यालयीन वेळेत जारी केले जातील. या कामाची सीलबंद निविदा दि. २८/०३/२०२५ रोजी १७.०० वाजेपर्यंत किंवा आधी नमूद केलेल्या कोणत्याही कार्यालयात सादर करता येईल आणि शक्य असल्यास खालील नमूद तारखेला व वेळेवर म.जी.प्रा.च्या सक्षम प्राधिकरणाद्वारे उघडल्या जातील.

| अनु. | निविदा सूचना क्रमांक | कामाचे नांव | निविदेची अंदाजित किंमत (रु.) | इसारा रक्कम (रु.) | सुरक्षा अनामत रक्कम (४%) (रु.) | काम पूर्ण करण्याचा कालावधी | कोऱ्या निविदा फॉर्मची किंमत रु. | म.जी.प्रा.कडे नोंदणीकृत कंत्राटदाराचा वर्ग | सिलबंद निविदा स्विकारण्याचा दिनांक व ठिकाण | सिलबंद निविदा उघडण्याचा दिनांक व ठिकाण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | ७१ (दुसरा पुकार) सन २०२४-२५ | M & R to Ambernath Water Works-Cleaning of Various GSR/MBR/ESR/Sump in Ambernath area | ६,९७,९६६/- | ६,९८०.००/- | एकूण रक्कम रु. २७९२०/- (अ) प्रारंभिक रक्कम रु. १३९६०/- (ब) चालू देयकातून वसूल होणारी रक्कम रु. १३,९६०/- | ६ महिने | ५९०.००/- | The Firm/Contractor should registered with MJP in class VII and above. (Civil) MIDC/CIDCO/PWD Or Any Govt. Department in India in (Civil) Equivalent class of MJP | दि. २८/०३/२०२५ रोजी १७.०० वाजेपर्यंत कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, साई विभाग, रोड नं. ८२, अंबरनाथ (पूर्व) | दि. ०१/०४/२०२५ रोजी १२.०० वाजता. कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, रोड नं.८२, अंबरनाथ (पूर्व) |

टिप- १) सविस्तर निविदा सूचना कार्यकारी अभियंता, एमजेपी विभाग, अंबरनाथच्या सूचना फलकावर पाहिली जाऊ शकते. विनंती केल्यास त्याची प्रत विनामूल्य मिळू शकते.
२) अर्जासह खालील कागदपत्रे जमा करणाऱ्या कंत्राटदारांना रिक्त निविदा फॉर्म देण्यात येईल.
अ) वैध नोंदणी प्रमाणपत्र.
ब) रिक्त निविदा फॉर्मच्या किंमतीची भरपाई
क) जीएसटीसाठी नोंदणी प्रमाणपत्र
३) रिक्त निविदा फॉर्म पोस्टद्वारे पाठविल्या जाणार नाहीत. कोणतीही किंवा सर्व निविदा कोणतीही कारणे न देता नाकारण्याचा अधिकार सक्षम प्राधिकरणाने राखून ठेवला आहे.

सही/-
कार्यकारी अभियंता,
म.जी.प्रा.ज.व्य. विभाग,
अंबरनाथ.

* जावक क्रमांक : जिमाका/ठाणे/जाहि/2024-2025/104

# प्रधानमंत्री इंटर्नशिप योजना

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य विकास, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाअंतर्गत रायगड जिल्ह्यातील उमेदवारांना बेरोजगार उमेदवारांसाठी प्रधानमंत्री इंटर्नशिप योजनेअंतर्गत तरुणांना मोठ्या कंपन्यामध्ये इंटर्नशिपची संधी दिली जाणार आहे. युवक युवतींना रोजगाराची संधी आहे. तसेच योजनेच्या दुसऱ्या फेरीसाठी पुन्हा अर्ज प्रक्रिया सुरू करण्यात आलेली आहे. याकरिता दिनांक ३१ मार्चपर्यंत अर्ज करता येणार आहे. तसेच प्रधानमंत्री इंटर्नशिप योजनेअंतर्गत उमेदवारांना १२ महिन्यांसाठी इंटर्नशिप मिळणार आहे. त्याकरीता दरमहा रूपये ५०००/- मिळणार आहेत. याशिवाय इंटर्नशिप पूर्ण झाल्यानंतर रूपये ६०००/- एक रक्कमी अनुदान दिले जाईल. या योजनेअंतर्गत भारत सरकारकडून प्रत्येक प्रशिक्षणार्थींना प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना आणि प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजनेअंतर्गत विमा संरक्षण दिले जाणार आहे. जिल्ह्यातील पात्र उमेदवारांनी http://pminternship.mca.gov.in या अधिकृत संकेतस्थळाला भेट देऊन आपली नोंदणी करावी. जिल्ह्यातील जास्तीत जास्त इच्छुक पात्र उमेदवारांनी याचा लाभ घेण्यासाठी http://pminternship.mca.gov.in या अधिकृत संकेतस्थळाला भेट देऊन आपली माहिती भरावी. अधिक माहितीसाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, वैभव निवास, भंडार आळी, चेंढरे अलिबाग कार्यालयाच्या दुरध्वनी क्र.०२१४१-२२२०२९ आणि कार्यालयाचे श्री. चैतन्य कुलकर्णी यांचा भ्रमणध्वनी क्र. ९०८२०३०६९२ यांच्याशी संपर्क साधावा.

## संक्षिप्त

# बिजोत्सवानिमित्त भाविकांनी घेतला ढकूचा आस्वाद



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : संत तुकाराम महाराजांच्या सदेह वैकुंठ गमनाचा दिवस म्हणजे तुकाराम बीज. हीच तुकाराम बीज पेण तालुक्यात धोंडपाडा येथे मोठ्या भक्तिभावाने साजरी करण्यात आली.१६ व १७ मार्चला तुकाराम बीज महोत्सवात हजारो भाविकांनी ढकूचा आस्वाद घेतला. या दिवशी हजारो भाविकांनी संत तुकाराम महाराजांचे दर्शन घेतला.

संत तुकाराम महाराज पेण तालुक्यातील धोंडपाडा येथे मिरचीच्या व्यवसायानिमित्त यायचे. संत तुकाराम महाराजांचे दीडशे वर्ष पुरातन मंदिर धोंडपाडा गावात आहे. शेकडो वर्षांपासून येथे तुकाराम बीज साजरी करण्यात येते.सासरवाशिनी व माहेरवाशिणी मोठ्या आवडीने या कार्यक्रमासाठी दुरदुरवरून येतात. कालांतराने या मंदिराचे जीर्णोद्धार करण्यात आले. मंदिराबाहेर सभा मंडप उभारण्यात आले आहे. भव्यदिव्य स्वरूपात असलेल्या बिजोत्सोवात तालुकासह राज्यातील हजारो भाविक व वारकरी सहभागी होतात. सात दिवसांत संत तुकाराम बिज उत्सवा निमित्ताने पहाटे पाच वाजल्यापासून रात्रीपर्यंत काकडआरती, ज्ञानेश्वरीचे पारायण, तुकाराम गाथेचे वाचन, प्रवचन, हरिपाठ, कीर्तन, भजन इत्यादीचे आयोजन करण्यात आले. या बिजोत्सोवाची सांगता १७ मार्च रोजी महाराजांची पालखी व महाप्रसादाने झाली. यावेळी महाप्रसादामध्ये भाविकांनी दिलेल्या विविध प्रकारच्या फळभाज्या शेंगा डाळीमध्ये टाकून ढकु तयार करण्यात येतो. तो भाताबरोबर महाप्रसादात देण्यात येतो. या ढकूचा आस्वाद हजारो भाविकांनी घेतला.या कार्यक्रमाचा व महाप्रसादाचा लाभ घेण्याकरिता पेण रायगडसह राज्यातील हजारो भाविक धोडपाडा गावात हजेरी लावतात. या भक्तीमय बिजोत्सोवाचा लाभ जास्तीत जास्त संख्येने भाविकांनी घ्यावा असे आवाहन ग्रामस्थांनी केले होते त्या आवाहनाला सकारात्मक प्रतिसाद भाविकांनी दिला.

# थकीत मालमत्ता करदात्यांनी लोकअदालतीचा लाभ घ्यावा

## केडीएमसीचे आवाहन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, नवी दिल्ली व महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, ठाणे यांच्या निर्देशानुसार "राष्ट्रीय लोक न्यायालय" शनिवार दि.२२ मार्च रोजी अति. जिल्हा व सत्र न्यायालय, कल्याण येथे आयोजित करण्यात आले आहे. या लोक अदालतीमध्ये एकूण २१ हजार १४२ दावा दाखल पूर्व प्रकरणे (प्री लिटीगेशन मॅटर्स) घेण्याकरीता न्यायालयाच्या सही शिक्याच्या नोटीसा तयार करण्यात आल्या असून या नोटीसा संबंधित प्रभागामार्फत संबंधितांना वाटप करण्याचे काम चालू आहे.

लोक अदालतीमध्ये जास्तीत जास्त नागरीक उपस्थित राहण्याची शक्यता विचारात घेता, कोर्ट आवारात मंडप टाकण्यात येत असून, प्रभागनिहाय कर्मचा-यांच्या आसन व्यवस्थेकरीता टेबल, खुर्चा, पंखे, संगणकीय यंत्रणा व पाण्याची व्यवस्था करण्यात येत आहे. कोर्टाच्या आवारात अग्निशमन व रुग्णवाहिका व आवश्यकतेनुसार पोलिस बंदोबस्त व्यवस्था ठेवण्यात येत आहे. तरी, सर्व थकीत मालमत्ता करदात्यांनी याचा लाभ घ्यावा व महापालिकेस सहकार्य करुन विकासाला हातभार लावावा असे आवाहन प्रशासनामार्फत करण्यात आले आहे.

# बाबा गुरबचनसिंह मेमोरियल क्रिकेट टूर्नामेंटची यशस्वी सांगता




दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : समर्पण आणि एकत्वाचा पावन संदेश साकार करत 25 व्या बाबा गुरबचनसिंह रौप्य महोत्सवी क्रिकेट टूर्नामेंटची संत निरंकारी आध्यात्मिक स्थळ, समालखा येथे 15 मार्च रोजी भव्य सांगता झाली. 25 फेब्रुवारी पासून सुरू झालेल्या या प्रतिष्ठित क्रिकेट स्पर्धेमध्ये देशभरातून आलेल्या 24 टीमनी भाग घेतला ज्यामध्ये खेळाचे कौशल्य आणि आध्यात्मिक मूल्यांचा अद्भुत संगम दृष्टिगोचर झाला.

या स्पर्धेमध्ये भटिंडा, बरेली, आग्रा आणि चंदिगड या टीमनी खेळाचे उत्तम प्रदर्शन करत अंतिम चार संघांमध्ये स्थान मिळवले. अंतिम सामन्यात आग्रा आणि भटिंडा या दोन संघांमध्ये खेळ भावनेचे उत्तम प्रदर्शन करत मुकाबला झाला, ज्यामध्ये आगरा टीमने आपली मेहनत अनुशासन आणि खेळाचे कौशल्य दाखवत विजयश्री प्राप्त केली. मॅन ऑफ द सिरीजचे पारितोषिक आग्रा टीमचे दीपक राजपूत यांनी पटकावले. या स्पर्धेमध्ये खेळाडूंचे मनोबल उंचावण्यासाठी त्यांना प्रमाणपत्रे देऊन सन्मानित करण्यात आले.

ही संपूर्ण टूर्नामेंट सद्गुरु माता सुदिक्षा जी महाराज यांच्या निर्देशानुसार जोगिंदर सुखीजा, सचिव संत निरंकारी मंडळ यांच्या नेतृत्वाखाली आयोजित करण्यात आली. याप्रसंगी त्यांनी सांगितले, की ही टूर्नामेंट केवळ प्रतिस्पर्धेचे रूप नसून खेळाडूंसाठी परस्पर सौहार्द प्रेम आणि एकोप्याची भावना प्रत्यक्ष अभिव्यक्त करण्याचे माध्यम ठरली.

टूर्नामेंटच्या भव्य सांगता समारंभामध्ये मुख्य अतिथी एस. एल. गर्ग, कन्विनर केंद्रीय योजना व सल्लागार बोर्ड यांनी विजयी संघाला ट्रॉफी प्रदान करून सन्मानित केले. या भव्य समारंभामध्ये संत निरंकारी मंडळाच्या प्रधान राजकुमारी याही उपस्थित होत्या. आपल्या प्रेरणादायक संबोधनांमध्ये त्या म्हणाल्या, की खेळ केवळ जीत आणि हार एवढ्या पुरतेच सीमित नसतात तर ते आत्मविकास अनुशासन खिलाडू वृत्ती आणि सामूहिक समर्पणाचे प्रतीक आहेत.

हे केवळ खेळांचे आयोजन नव्हते तर सद्गुरु माताजींच्या शिकवणुकींनी प्रेरित एक आध्यात्मिक अभियान होते ज्यामध्ये प्रेम सौहार्द आणि विश्वबंधुत्वाचे उत्कृष्ट प्रदर्शन झाले. खेळाडूंनी मैदानावर केवळ जिंकण्यासाठी नाही तर श्रेष्ठ मानवी मूल्यांचा अंगीकार आणि प्रसार करण्यासाठी भाग घेतला. संत निरंकारी मिशनच्या या अनुकरणीय प्रयासाने हे सिद्ध केले की खेळ केवळ प्रतिस्पर्धीचे माध्यम नसून प्रेम सेवा आणि एकत्वाच्या भावनेने जगण्याचे सशक्त व्यासपीठ देखील बनू शकते.

### शिवसेनेच्या भारती जाधव यांच्या प्रयत्नातून

# मंगल राघो नगर प्रभागात विकासकामाचा शुभारंभ



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या नागरी सुविधा विकास निधीतून कल्याण पूर्वेतील प्र.क्र. ८९ मंगल राघो नगर मधील नागरी सुविधा कामांचा भूमिपूजन सोहळा नुकताच संपन्न झाला. कल्याण पूर्व शिवसेना विधानसभा संघटक भारती जाधव यांच्या विशेष प्रयत्नाने तसेच पाठपुराव्याने गणेशनगर मधील आजूबाजूच्या परिसरात व शबरी सोसायटीत विविध नागरी सुविधा कामे आता मार्गी लागणार आहेत. ही कामे सुमारे २५ लाख रुपयांच्या विकास निधीतून केली जाणार आहेत.

आयोजित भूमिपूजन सोहळयास शिवसेनेचे कल्याण पूर्व शहरप्रमुख निलेश शिंदे, उपनेत्या विजया पोटे, जिल्हा प्रमुख छाया वाघमारे, उपजिल्हा संघटक राधिका गुप्ते, विभाग संघटक शैला दराडे, शाखा प्रमुख राधिका देठे, राणी कपोते, समाधान मोरे आदी पदाधिकारी, कार्यकर्ते व परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्र.क्र.८९ मंगल राघो नगर मधील गणेश नगर भागातील नागरिक अनेक दिवस त्यांना भेडसावणाऱ्या समस्या घेऊन येत होते. या समस्यांचे निराकरण करण्यासाठी काही दिवस पाठपुरावा देखील सुरू होता. खासदार डॉ.श्रीकांत शिंदेंनी त्वरित दखल घेत या भागातील नागरी समस्या सोडवण्यासाठी 25 लाख रुपयांचा विकास निधी मंजूर करून दिला. आता याच निधीतून परिसरातील नागरी सुविधा मार्गी लागणार असल्याची माहिती विधानसभा संघटक भारती जाधव यांनी दिली.

याबद्दल त्यांनी प्रभागातील नागरिकांच्या वतीने खासदार डॉ.श्रीकांत शिंदे यांचे आभार मानले आहेत. विकासकामे करण्यावर त्यांचा नेहमीच पुढाकार असतो. समस्या दिसेल तिथे लगोलग तोडगा ते काढतात असेही यावेळी जाधव म्हणाल्या. दरम्यान विकास कामांचा शुभारंभ झाल्यानंतर प्रभागातील नागरिकांनी विशेष प्रयत्न केल्याबद्दल भारती जाधव यांचेही आभार व्यक्त केले.

# रायगड जिल्ह्यात पंडित दिनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

रायगड : जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, रायगड-अलिबाग व पातळगंगा आणि रसायनी इंडस्ट्रीज असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने दि.27 मार्च, 2025 रोजी सकाळी 10.00 ते दुपारी 02.00 या वेळेत आपल्या पातळगंगा आणि रसायनी इंडस्ट्रीज शाळा, पी 23 एम.आय.डी.सी. निवासी परिसर, मोहपाडा ता. खालापूर जि. रायगड येथे पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा व मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना (इंटर्नशिप) उमेदवार निवड मेळावा आयोजित केला आहे. या रोजगार मेळाव्याकरीता रायगड जिल्ह्यातील खाजगी आस्थापनांना रिक्तपदे अधिसूचित करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

तरी रायगड जिल्ह्यातील सर्व खाजगी उद्योजकांनी आपल्या आास्थापनेतील कुशल/अकुशल रिक्तपदे जास्तीत जास्त या कार्यालयास कळविण्यात यावीत. तसेच शासनाच्या माध्यमातून खाजगी कंपन्यातील जास्तीत-जास्त रिक्तपदे रोजगार मेळाव्यातून भरती करण्यात येणार आहे. याकरिता या विभागाचे संकेतस्थळावर https://rojgar.mahaswayam.gov.in नोंदणी केलेल्या आस्थापनांनी प्रथम आपल्याकडे हवे असलेले कुशल/अकुशल मनुष्यबळाची माहिती भरावी. ही माहिती भरताना प्रथम उपरोक्त संकेतस्थळावर Employment - Employer (List a Job)- Employer Login या क्रमाने जाऊन आपल्या आस्थापनेचा युजर आयडी व पासवर्ड वापरुन आपल्या आस्थापनेची माहिती पहावी. त्यातील Pandit Dindayal Upadhyay Job Fair या ऑप्शनमधून दिसणाऱ्या रोजगार मेळाव्यांच्या यादीतील आपल्या जिल्ह्याच्या नावावरील View Details - Job Details - Agree and Post Vacancy- Add New Vacancy ऑप्शनवर क्लीक केल्यानंतर रिक्तपदांची माहिती भरुन शेवटच्या पानावरील Save Vacancy वर क्लीक करावे. त्याचप्रमाणे ज्या आस्थापनांची यापूर्वी उपरोक्त संकेतस्थळावर नोंदणी करण्यात आलेली नाही त्यांनी https://rojgar.mahaswayam.gov.in या संकेतस्थळावर Employment-Employer (List a Job)-Registerया क्रमाने जाऊन नवीन नोंदणी करावी व आपल्या आस्थापनेची नवीन नोंदणी केल्यानंतर उपरोक्तप्रमाणे आपलेकडील रिक्त पदे अधिसूचित करुन संकेतस्थळावर दिनांक 24/03/2025 पर्यंत अधिसूचित करावीत.संकेतस्थळावर नवीन नोंदणी करणे व रिक्तपदे अधिसूचित करणे या संदर्भात आपणास काही समस्या असल्यास या कार्यालयाचा दूरध्वनी क्रमांक 02141-222029 किंवा श्री. महेश भा.वखरे, लिपिक-टंकलेखक यांचे 9421613757 या भ्रमणध्वनी क्रमांकावर वर संपर्क साधावा. असे आवाहन श्रीम.अ.मु.पवार,सहायक आयुक्त,कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र,रायगड-अलिबाग यांनी केले आहे.

# पावसाळ्यापूर्वी एमएमआरडीएची कामे मार्गी लागणार का ?

## रस्ता,काँक्रीटीकरण,गटारबांधणीसोबत सेवा वाहिन्यांच्या खोदकामांची भर त्यामुळे पावसाळ्यापूर्वी कामे पूर्ण होणार का? नागरिकांमध्ये संभ्रम



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण डोंबिवली मनपा क्षेत्रातील डोंबिवली मध्ये एमएमआरडीए, सार्वजनिक बांधकाम विभागा मार्फत रस्त्यांच्या काँक्रीटीकरणाची कामे सुरू आहेत. त्यात गटारबांधणीची कामे चालू असताना आता सेवा वाहिन्यांच्या कामांची देखील भर पडणार आहे. काँक्रीटीकरणाची कामे पावसाळ्यापूर्वी मार्गी लावण्याचे लक्ष केडीएमसीने ठेवले असले तरी. पावसाळ्यापूर्वी कामे पूर्ण होतील का ? असा सवाल नागरिक विचारत आहेत.

डोंबिवली मध्ये गेल्या वर्षभरापासून शहरामध्ये रस्त्यांच्या काँक्रीटीकरणाची कामे सुरू आहेत. आगामी पावसाळा पाहता सध्या कामांना वेग आला असून. ही कामे एमएमआरडीए आणि पीडब्ल्यूडी विभागाकडून सुरू असून या कामाची देखरेख केडीएमसी करीत आहे. रस्त्याच्या सुरू असलेल्या विकास कामामुळे नागरिकांना काही ठिकाणी पर्यायी रस्त्याचा वापर करावा लागत असून,वळसा घालून वाहनांना जावे लागत आहे. त्यामुळे उशीरा ला सामारे जावे लागण्याची वेळ आली आहे. अवघ्या अडीच महिन्याच्या कालावधीत पावसाळा सुरू होईल. यामुळे प्रशासनाने नियोजन तसेच समन्वय साधत पावसाळा सुरु होण्यापूर्वी रस्त्याच्या कामाला गती देत रस्त्याच्यी विकास कामे मार्गी लावली पाहिजेत अशी मागणी यानिमित्ताने जोर धरू पाहत आहे.

"कल्याण डोंबिवली मनपा शहर अभियंता अनिता परदेशी यांनी दोन दिवसापूर्वी एमएमआरडीए आधिकारी, आणि केडीएमसी आधिकारी यांच्या समवेत संयुक्त पाहणी करीत रस्त्याच्या आढावा घेतला असून पावसाळयापूर्वी सुरू असलेली रस्त्याच्यी विकास कामे मार्गी लावण्याचा प्रशासनाचा मानस असल्याची प्रतिक्रिया प्रसिद्धी माध्यमांना यानिमित्ताने दिली."

# वाळू तस्करीला आळा घालण्यासाठी सर्वंकष वाळू धोरण

### - मंत्री चंद्रशेखर बावनकुळे

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता


मुंबई : वाळू तस्करीवर नियंत्रण ठेवण्यासाठी सध्या राज्यात महसूल आणि पोलीस दलाकडून संयुक्त कारवाई करण्यात येते. परंतु राज्यात वाळू माफिया आणि वाळू तस्करीच्या घटना वाढतच आहेत. यासाठीच राज्य शासन सर्वंकष वाळू धोरण तयार करणार आहे, अशी माहिती महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधानपरिषदेमध्ये दिली.

विरोधीपक्ष नेते अंबादास दानवे यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर देताना मंत्री बावनकुळे बोलत होते. यावेळी सदस्य प्रविण दरेकर, शशिकांत शिंदे, एकनाथ खडसे यांनी चर्चेमध्ये सहभाग घेतला.

राज्यात वाळू माफियांना आणि वाळू तस्करांना संरक्षण मिळणार नाही अशी ग्वाही देऊन मंत्री बावनकुळे म्हणाले की, गोदावरी खोऱ्यातील वाळू उपसाबाबत ७ दिवसात चौकशीकरून दोषींवर कठोर कारवाई करण्यात येईल. राज्य शासन नव्या वाळू धोरणाबाबत काम करत असून यानुसार आता एम सॅन्ड म्हणजेच दगडापासून तयार केलेल्या वाळूच्या वापरावर भर देण्यात येणार आहे. यासाठी राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात वाळू क्रशर उभारण्यात येणार आहे. त्यासाठी अर्थसहाय्य देण्यात येणार आहे. प्रत्येक जिल्ह्यात किमान ५० ते १०० अशा प्रकारचे क्रशर उभारण्याचे नियोजन आहे. यामुळे वाळूची उपलब्धता वाढून सध्या वाळू पुरवठा आणि मागणीमध्ये असलेली तफावत दूर होणार आहे. त्यामुळे वाळू माफियांवर आपोआप नियंत्रण येईल. तसेच वाळू तस्करीबाबत महसूल व पोलीस अधिकारी यांना कारवाईचे समान अधिकार देण्याचाही वाळू धोरणामध्ये समावेश असणार आहे. वाळू धोरण तयार करताना लोकांच्या सूचनांचाही त्यामध्ये अंतर्भाव करण्यात आला आहे. त्याशिवाय रत्नागिरी, रायगड जिल्ह्यामध्ये सुरू असलेल्या सक्शनपंपाच्या सहाय्याने वाळू उपशाची चौकशी करून कारवाई करण्यात येईल, असेही मंत्री बावनकुळे यांनी सभागृहात सांगितले.

तसेच सदस्य शशिकांत शिंदे यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर देताना मंत्री बावनकुळे म्हणाले की, सातारा जिल्ह्यातील खटाव येथील प्रकरणी विभागीय आयुक्तांमार्फत ७ दिवसात चौकशी करुन चौकशीमध्ये दोषी आढळणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येईल.

# कारच्या धडकेत दुचाकीस्वारांचा जागीच मृत्यू



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : मार्च २०२५ रोजी सासणे गावाच्या हद्दीत म्हसा मुरबाड रोडवर सासणे येथील टेपाची वाडी येथील दोन रहिवासी कारच्या धडकेत जागेवरच ठार झाले आहेत. ही घटना रविवारी सायंकाळी सहा वाजता दरम्यान घडली आहे. या घटनेने टेपाचीवाडी-सासणे गावावर शोककळा पसरली आहे.

म्हसा मार्गे मुरबाड कडे येत असताना एम एच ४६ ऐ बी २२२० ह्युंदाई चार चाकी कारणे कारचालक श्याम तुळशीराम घायवट (वय वर्ष ३६) राहणार सांगवी पोस्ट कोंदीवडे तालुका कर्जत जिल्हा रायगड येथील चालकाने क्रमांक एम एच ०१ ऐ बी ९८२८ ह्या मोटरसायकल वरील दुचाकी स्वार जयवंत दुंदा खुटारे (वय वर्ष ५५) व दीपक दामोदर ठाकरे (वय वर्ष ४५) राहणार टेपाची वाडी - सासणे यांना समोरासमोर येऊन जोराने धडक दिली सदर धडकेत दोघेजण जागीच ठार झाले आहेत. अपघातात दोन्ही गाड्यांचा नुकसान झाले आहे.गंभीर प्रकारची इजा झाल्याने दोघेही मोटरसायकल स्वार जागेवरच ठार झाले असून सदर मृत्यूस कारण असलेले वाहन चालक यांच्यावरती मुरबाड पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा नोंद करण्यात आला असून अधिक तपास मुरबाड पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप गीते हे करत आहेत.




'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री.रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले.
(या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही) (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८, ९०८२६६४७८१ E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024